# शिकाऊ उमेदवार वीजतंत्री व तारमार्गतंत्री जाहिरात

म.रा.वि.वि.कं.मर्या., मालेगाव मंडल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मालेगाव, मनमाड, सटाणा व कळवण विभागाकरिता नाशिक जिल्ह्यातील शिकाऊ प्रशिक्षणार्थी वीजतंत्री (Apprentice Electrician) पदाकरीता ६० व प्रशिक्षणार्थी तारमार्गतंत्री (Apprentice Lineman) पदाकरीता ६० असे एकुण १२० पदे भरण्याकरीता जाहीरात.

अटी व शर्ती– १) वयोमर्यादा – जाहीरातीच्या तारखेस वय १८ वर्षे पुर्ण असावे व जास्तीत जास्त वय २१ वर्षे (अ.जा. व अ.ज. करीता ५ वर्षे शिथिलक्षम) २) सदर उमेदवार हा नाशिक जिल्ह्यातीलच रहिवासी असावा. ३) शैक्षणिक पात्रता–उमेदवार हा १० वी उत्तीर्ण असावा व महाराष्ट्र शासनमान्यता प्राप्त आय.टी.आय. वीजतंत्री/ तारमार्गतंत्री (फेब्रुवारी २०१८ नंतर) उत्तीर्ण असावा **आय.टी.आय गुणांची** अट खुल्या प्रवर्गाकरिता किमान ६०% व मागास प्रवर्गातील (अ.जा./अ.ज.) उमेदवारांकरीता किमान ५५% ४) कागदपत्र जमा करणेपुर्वी www.apprenticeship.gov.in या वेबसाइटवर नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे. ५) प्रशिक्षण कालावधी – नियुक्ती दिनांकापासुन एक वर्ष राहिल. ६) प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. ७) उमेदवाराने आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे **(शाळा सोडल्याचा दाखला, १० वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र / गुणपत्रक, I.T.I. च्या चारही सत्रांची गुणपत्रिका)** अधिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र व आधारकार्ड यांच्या साक्षांकित छायाप्रती दि. ०२/०३/२०२१ पर्यंत जमा करावे. त्यानंतर सादर केलेले कागदपत्रे कोणत्याही सबबी खाली विचारात घेतले जाणार नाहीत. ८) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.९) जाहीरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. १०) शिकाऊ उमेदवार निवड प्रकियेदरम्यान उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. ११) नाशिक जिल्ह्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्यावर कागदपत्रे जमा करावीत. १२) **अंतिम निवड यादी आय.टी.आय. गुणांच्या आधारे तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल.**

**पत्ता :– अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.क.मर्या., मालेगाव मंडल कार्यालय,** १३२ के.व्ही. सोयगांव उपकेंद्र, मालेगाव, जि. नाशिक.

**वेळ :– सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:०० पर्यंत** (कार्यालयीन कामकाजाचे दिवशी)

अधिक्षक अभियंता,
म.रा.वि.वि.कं. मर्या., मालेगाव मंडल.

पीआरओ नं:–०५२